# माळपठारावरील उसतोड कामगारांच्या पाल्यांच्या शैक्षणिक स्थिती व समस्यांचे अध्ययन

**प्रा.डॉ.स्वाती दळवी**
गुलाम नबी आझाद समाजकार्य महाविद्यालय, पुसद, जि. यवतमाळ
Swatiwath75@gmail.com

***प्रस्तावना –***

*(महाराष्ट्र टाईम्स 28 जानेवारी 2023 उसतोड कामगारांच्या मुलांच्या हक्कांचे काय)*

*पुसद तालुक्यातील माळपठार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 40 गावांतील स्थलांतराचा प्रश्न दिवसेंदिवस अधिकाधिक बिकट होत चालला आहे. डोंगराळ भूभाग, सिंचनाचा अभाव, रोजगाराचा गंभीरप्रश्न आणि ओस पडलेल्या औद्योगिक वसाहती यामुळे याभागातील कामगारांना रोजगारासाठी स्थलांतर करावे लागते. यामध्ये प्रामुख्याने उस तोडणीसाठी जाणाऱ्या मजूरांचे प्रमाण अधिक आहे. आईवडील स्थंलातरीत होतांना सहाजिकच आपल्या पाल्यांनाही सोबत घेवून जातात आणि पर्यायाने या मुलांच्या शिक्षणाचा गंभीर प्रश्न उभा राहतो. माळपठारावरील मजूर उसतोडणीसाठी थंडी, पाऊस, उन वारा व एकंदरीत सुरक्षितता याचा विचार न करता पश्चिम महाराष्ट्र मराठवाडयातील कारखाना क्षेत्रात मजूरीला जातो. पोटाची खळगी भरण्यासाठी आपल्या लहान लहान लेकरांसह आपला संसार ट्रॅक्टर, बैलगाडी भरून उसतोडणीला जातांना गावेच्या गावे ओस पडलेली दिसतात. सप्टेंबर ते मार्च एप्रिल पर्यंत या भागातील शाळांची पटसंख्याही अवघ्या 30टक्के वर येते. यामुळेच या मुलांच्या शिक्षणाचा व एकदंरीतच सुरक्षितेचा प्रश्न गंभिर स्वरूप धारण करतो आहे. यावर तातडीने उपाययोजना आखून त्या तत्परतेने आमंलात आणण्याची गरज आहे.*

**अध्ययनाचे उद्देश –**

1) माळपठारावरील उसतोड कामगारांच्या पाल्यांच्या शैक्षणिक अडचणी जाणून घेणे.

2) उसतोड मजूरांच्या पाल्यांसाठी असणाऱ्या शैक्षणिक योजनांच्या अंमलबजावणीचा अभ्यास करणे.

3) उसतोड कामगारांच्या मुलांच्या इतरा संस्थाचा अभ्यास करणे.

लोकमत – उसतोड कामगार निघाले कारखाण्याकडे 06 नोव्हेंबर 2016 (40 हजारांवर)

आईवडील उस तोडणीला गेल्यानंतर शाळेत शिकणारी त्यांची मुलेही त्यांच्या सोबतच जातात. गावातील शाळांत ही मुल पटावर दाखवल्या जात असली तरी ती शालाबाह्यच असतात आणि त्यांच्या शैक्षणिक हक्कांसाठी गेली अनेक दशके विविध सामाजिक संघटना आंदोलने करित आहेत. वर्षानुवर्ष या मुलांचा शिक्षणाचा प्रश्न प्रलंबित आहे.

एकीकडे देश स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करित असतांना स्थलतरासारखा गंभीर प्रश्न मात्र अनुत्तरीतच राहिला आहे. साखर शाळा, वसतीगृहांच्या घोषणा होतात. त्यासाठी अनुदाने ही दिली जातात. परंतु त्यांची अमंलबजावणी मात्र पुरेपुर होतांना दिसत नाही.

महाराष्ट्रात सर्व शिक्षा अभियानानुसार 6 ते 14 वर्षाच्या सर्व मुलांना सक्तीच्या व मोफत शिक्षणाची सोय सरकारने केली आहे. या तरतुदीचे रूपांतर 2009 मध्ये सरकारने कायदयात केल्यामुळे कायद्यानेही मुलांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाची हमी दिली आहे.

परंतु दुदैवाने उसतोड मजूरांच्या मुलांच्या बाबतीत या मुलांच्या शिक्षणाच्या बाबतीत शासनाचे प्रयत्न अपुरे पडतात असे अध्ययना अंती निदर्शनात येते आहे.

अध्ययनासाठी निवडलेल्या 100 उसतोड कामगार ज्यांची मुले जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षण घेतात त्यांच्यापैकी 77% जणांनी मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था कारखाना व्यवस्थापणाने केली नसल्याचे सांगितले.

अशा कारखान्यांना आसपासच्या जिल्हा परिषद शाळांमध्ये या मुलांच्या शिक्षणाची सोय करणे त्यासाठी पालकांना विश्वासात घेवून त्यांच्याशी चर्चा करून या मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे गरजेचे असते परंतु याबाबतची कारखानाा प्रशासनाची उदासिनता दिसून येते.

माळपठरावरील उसतोड कामगारांच्या मुलांच्या शिक्षणाच्या प्रश्नासोबतच त्यांच्या सुरक्षितेचा प्रश्नही फार चिंतनीय असाच आहे. उसतोड कामगार पत्नीसही भल्या पहाटे कामाला निघून जातो. ही लहान मुले फडावरच असतात किंवा सोबत उसतोडायला नेली जातात. किमान सहा महिने ही मुले शाळेपासून वंचित राहतात. फडावर त्यांच्या सोबत अतिप्रसंग घडणे, साप, विंचू चावणे, यासारख्या घटना सातत्याने घडत असल्याचे 88% पालकांनी म्हटले आहे.

परंतु गावाकडे या मुलांना सांभाळणारे कोणी नसल्याने व रोजगाराचा प्रश्न गंभीर असल्याने त्यांना सोबतच घ्यावेच लागते असे या पालकांचे मत आहे.

**शिक्षक व शाळांची भूमिका**

उसतोड मजूरांच्या गावातील जिल्हा परिषदेच्या शाळांमधील शिक्षकांची भूमिकाही फार महत्त्वपूर्ण असते या संशोधन विषयाच्या अनुषंगाने त्यांच्याशी चर्चा केली असता. त्यांनी असे सांगितले की या मुलांना सोबत नेऊ नका असे अवाहन जिल्हा परिषद शाळांकडून पालकांना केले जाते. परंतु घरी सांभाळण्याकरिता कोणी नसणे शिवाय पाळीव प्राण्यांची जसे की शेळया यांच्याकडे लक्ष देण्यासाठी या मुलांनाही स्थलांरीत केले जाते. त्यामुळे त्यांच्यातील बहुतांश मुले ही शाळाबाह्य होवून शिक्षणापासून वंचित राहतात.

गावातील शाळांमधून हमीपत्र घेवून ज्या भागात हे उसतोड कामगार स्थलांतरीत होतात. तेथील शाळेत हे हमीपत्र जमा केल्यास विद्यार्थ्यांना त्या शाळेत तात्पुरता प्रवेश देता येतो. पण बहुतांश पालक असे हमीपत्र घेवून जात नाहीत. त्यामुळे हे विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहतात.

**शासनाच्या योजना व त्यांच्या अमंलबजावणी**

माळपठारावरील आणि संपूर्ण महाराष्ट्रातील उसतोड कामगारांचे जीवनमान उंचावण्यासाठी त्यांच्या मुलांच्या हातात उस तोडण्याचे कोयते देण्याऐवजी पेन, पेन्सील, वहया पुस्तके असे शैक्षणिक साहित्य यावे यासाठी शासनाचे प्रयत्न सुरू केले आहेत. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या माध्यमातून उस तोड मजूरांना ओळखपत्र देण्याची मोहीम सुरू करण्यात आली आहे. लोकनेत गोपीनाथराव मुंडे उसतोड कामगार कल्याण महामंडळाची स्थापना करण्यात आली असून त्या माध्यमातून उसतोड कामगारांची नोंदणी करणे, त्यांना ओळखपत्र देणे, त्यांच्या मुलांचे शिक्षण आरोग्य व सुरक्षितता यासाठी कार्य केले जाणार आहे.

**निष्कर्ष**

उसतोड कामागारांची मुले त्यांच्यासोबत स्थलांतरीत होतात. त्यामुळे त्यांना शाळाबाह्य राहावे लागते.

– साखर कारखान्यांनी साखर शाळांची व्यवस्था करण्याच्या बाबतीत उदासिन धोरण स्वीकारले आहे त्यामुळे या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न निर्माण होतो.

– मुलांची सुरक्षितता आणि त्यांचा सांभाळ करायला गावाकडे कुणी नसणे यामुळे स्थलंतरीत मजूर मुलांना सोबतीला घेवून जातात.

– योजना अस्तित्वात असतात परंतु त्यांची अमंलबजावणी व्यवस्थीत होत नसल्याने उसतोड मजूरांच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न गंभिर बनला आहे.

– शिक्षक व शाळांनी आपापल्या भूमिकांशी प्रामाणिक राहून जबाबदारीने काम केल्यास व शासनाने उसतोड मजूरांच्या मुलांच्यासाठीच्या योजना सक्षम केल्यास ही समस्या समुळ नष्ट होवू शकते.

– माळपठारावरील सिंचनाचा अनुषेश भरून काढल्यास एकंदरीत स्थंलातरच कमी होवून हा प्रश्न निर्माण होणार नाही.

**संदर्भ**

१. महाराष्ट्र टाईम्स 28 जानेवारी 2023 ऊसतोड कामगारांच्या मुलांच्या हक्काचे काय?

२. लोकमत 6 नोव्हेंबर 2016 40 हजारांवर ऊसतोड कामगार निघाले कारखान्याकडे

३. सर्व शिक्षा अभियान अहवाल 2009